SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA
PHONE: EPABX-2609000 (10 lines)
FAX : 0091-0231-2693201 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2609000 (दहा लाईन्स)
फॅक्स : 0091–0231–2693201 व 2692333

Estd: 1962
'A' Re-accredited
by NAAC(2014)
with CGPA-3.16

जा.क्र./शिवाजी वि/लेखा/जमास्विकृती/178 दिनांक – 24/8/2017

## अत्यंत महत्वाचे

प्रति

विभागप्रमुख,
सर्व अधिविभाग / सर्व सलग्न महाविद्यालये.

**विषय - कॅशलेस ऑनलाइन पद्धतीने व्यवहार करणेबाबत.**

महोदय,

मा.राज्यपाल, यूजीसी यांनी विद्यापीठातील सर्व जमा तसेच खर्च व्यवहार हे कॅशलेस ऑनलाइन पद्धतीने करणेबाबत कळविले आहे हे आपणास ज्ञात आहेच. सदर बाबींच्या अनुषंगाने वित्त विभाग, शिवाजी विद्यापीठाने मागील व चालू वर्षी सर्व व्यवहार हे ऑनलाइन पद्धतीने करणेचे नियोजन केले आहे. यामध्ये खालील सर्व जमेविषयी सेवा विद्यापीठातील कर्मचारी, विद्यार्थी, पुरवठादार यांना देण्यात आलेल्या आहेत.

१. **Easy pay-Axis Payment Gateway** या मोड्यूल द्वारे विद्यापीठामध्ये कोणतेही विद्यापीठ स्तरावरील जमा व्यवहार करता येणार आहे. त्याचा **PATH** खालीलप्रमाणे -
⇨ **www.unishivaji.ac.in** ⇨ **Payment Gateway** ⇨ **Online Payment gateway** ⇨ **Easy Pay** याद्वारे रजिस्ट्रेशन करून सहज पेमेंट करता येईल.

२. **Convocation - Axis Payment Gateway** द्वारे **convocation fee** ऑनलाइन पद्धतीने भरता येऊ शकते.

३. एटीएम/डेबिट/क्रेडिट कार्ड द्वारे, विद्यापीठाच्या जमा स्वीकृती विभाग, दूर शिक्षण केंद्र, आरोग्य केंद्र, गेस्ट हाऊस या ठिकाणी जोडण्यात आलेल्या पीओएस मशीन द्वारे पेमेंट करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

४. या व्यतिरिक्त यूको बँक, विद्यानगर शाखा येथेही पैसे भरून विद्यापीठात रिसीट करता येईल.

परीक्षा विभागाकडून ज्या पद्धतीने दीक्षांत अर्ज पेमेंट गेटवेला जोडण्यात आला आहे, त्या पद्धतीने विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या सर्व अधिविभागानी स्वीकारण्यात येणारे विविध शुल्क (सेमिनार, वर्कशॉप) पेमेंट गेट वे ला जोडणेची कार्यवाही करावी, ज्यामुळे विद्यापीठातील सर्व व्यवहार कॅशलेस होतील. तसेच या सर्व सुविधांचा आपल्या स्तरावरून विद्यार्थ्यांपर्यंत जास्तीत जास्त पोहोचविता येईल यासाठी प्रयत्न करणेत यावेत.

मुख्यलेखापाल